# कै. बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय, हणेगाव.

# ता. देगलूर. जि. नांदेड.

## विभाग - मराठी

### वर्ग : बी. ए. तृतीय वर्ष सत्र V th. पेपर - साहित्यविचार X वा

प्रा. कांबळे एस.एस.

**अभ्यास घटक : साहित्याचे स्वरूप**

**प्रस्तावना :**

मानवाच्या जीवनामध्ये 'साहित्य' ही संज्ञा वेगवेगळया परीने वापरली जाते. साहित्याचा व्यावहारिक अर्थबोध 'सामग्री' असा होतो. जसे एखाद्या दुकानाच्या पाटीवर लिहिलेले असते. उदा. 'येथे सर्व प्रकारचे शालेय साहित्य मिळेल.' क्रीडा साहित्य, संगीत साहित्य, भजन- कीर्तनाचे साहित्य, बांधकामाचे साहित्य, शेतीचे साहित्य अशा विविधार्थाने हा शब्द वापरला जातो. परंतु जेव्हा आपण साहित्य शब्दापूर्वी कुठलाही शब्द न लावता केवळ 'साहित्य' असे संबोधतो, तेव्हा त्याचा अर्थ लेखन असा होतो. अर्थात जे जे लिहिलेले ते ते साहित्य अशी साहित्याची संकल्पना करता येते. 'साहित्य' या संज्ञेचा 'जे जे लिहिले किंवा छापले जाते ते' असा अर्थ घेता येतो. उदा. पत्रे, वृत्तपत्रे, मसुदा, जाहिराती इ. साहित्याचे स्वरुप आणि वैशिष्ट्ये आहेत.

## साहित्याचे स्वरुप व वैशिष्ट्ये : -

साहित्य कलेचे मूळ ही अनुभूतीची अभिव्यक्ती असते. साहित्य ही एका व्यक्तिमनाची नवनिर्मिती असते. कलावंत आपले अनुभवविश्व साहित्यातून व्यक्त करीत असतो. कल्पनाशक्तीच्या साह्याने तो एका अलौकिक अशा अनुभवसृष्टीची नवनिर्मिती अर्थात प्रतिसृष्टी निर्माण करीत असतो. साहित्याचा जीवनानुभवांशी संबंध असतो. ती व्यक्तिमनाची निर्मिती असली तरी व्यक्तिजीवनाबरोबरच समाज जीवनाचाही संबंध साहित्यात असतो.

## १. जीवनदर्शन हा साहित्याचा एक महत्वाचा विशेष -

जीवनदर्शन हा एक साहित्याचा महत्वाचा विशेष मानला जातो. तसेच साहित्य हे व्यक्तिनिष्ठ असते. निर्मात्याच्या व्यक्तिमनाचा ठसा साहित्यामध्ये उमटलेला असतो. उदा. संत तुकाराम यांच्या साहित्यातून ते विद्रोही, परखड, सत्यता, करारीवाण्याचे दर्शन घडते. किंवा 'श्यामची आई' यामध्ये साने गुरूजींचे मुलायम व्यक्तिमत्व दिसून येते. म्हणून व्यक्तिनिष्ठता हा साहित्याचा एक महत्वाचा विशेष होय.

## २. साहित्य हे सृजनात्मक असते –

साहित्य हे सृजनात्मक असते. ती एक व्यक्तिमनाची नवनिर्मिती असते. साहित्याचा समाजाशी संबंध असतो. सौंदर्यानुभूती आणि त्यातून रसनिर्मिती हे साहित्याचे जीवित आहे. यातून नवनवीन गोष्टींची निर्मिती होते.

## ३. भावनाजागृती हे साहित्याचे लक्षण आहे -

भावानुभवाचे आविष्करण हा साहित्याचा महत्वाचा विशेष होय.सौंदर्यानुभूती आणि त्यातून रसनिर्मिती हे साहित्याचे जीवित आहेत. कल्पना, विचार, भावना साहित्यामध्ये मांडत असतात.

## ४. साहित्यामध्ये लालित्याला म्हणजे सौंदर्याला महत्व असते –

साहित्यामध्ये लालित्याला म्हणजे सौंदर्याला महत्व आहे. चित्र शिल्प, नृत्य, संगीत, गायन आदी कलांप्रमाणेच साहित्य ही सुद्धा एक कला आहे.

## ५. भारतीय साहित्याचे स्वरुप

भारतीय साहित्य स्वरुपाचे आरंभीचे विश्लेषण म्हणजे भरताच्या 'नाट्यशास्त्र' या ग्रंथातून झालेले आहे असे मानले जाते. तसे पाहता नाट्यशास्त्राचा प्रमुख विवेच्य विषय नाट्यविद्या आहे. नाट्यशास्त्रातील सहाव्या, सातव्या अध्यायात रस-भावांचे विवेचन तर सोळाव्या अध्यायात काव्यलक्षण, अलंकार आहेत. नाट्यांतर्गत काव्यार्थाचे विभावन अभिनयाच्या द्वारे होते. त्यामुळे सौंदर्यनिर्मिती होते व रसिकाला रसाची प्रतीती येते. पुढे भामह, दण्डीच्या काळात काव्यशास्त्र नाट्यशास्त्रापासून वेगळे होऊन स्वतंत्रपणे वाटचाल करू लागले. तेव्हा काव्यनाट्यादी ललित कलांचे उद्दिष्ट सौंदर्यनिर्मिती व रसप्राप्ती ही गृहीत धरले जाते.

काव्यातील रसाला अनुभूती देणारे घटक म्हणजे अर्थव्युत्पत्ती शब्द, अलंकार, वक्रोक्ती रीती, औचित्य, ध्वनी होय. पण अभिनवगुप्तानंतर - विश्वनाथ व इतरांनी रसनिर्मितीच्या तत्त्वाकडून ही चर्चा रसस्वरूपाकडे म्हणजेच काव्याच्या अंतरंगाकडे नेली. तेव्हा काव्यातून 'अविष्कृत होणारे सौंदर्य रसात्मकतेत आहे' याला महत्व प्राप्त झाले.

"शब्दार्थौ सहिती काव्यम्' म्हणजेच शब्द आणि अर्थ याचा एकत्रितपणा म्हणजे काव्य होय, असे भामहचे मत होते. म्हणून साहित्यात शब्द आणि अर्थ ह्या दोन्हीला समान महत्व आहे. भामहने काव्याच्या बाह्य रंगाचाच विचार केला आहे. म्हणून दण्डीने 'इष्ट अर्थाने युक्त असलेली पदावली म्हणजे काव्यशरीर' असे प्रतिपादन केले. म्हणजेच शब्दांना काव्याचे शरीर मानून शब्दापेक्षा अर्थाचे महत्व विशद केले. तर, वामनाने शब्दाला काव्याचे शरीर मानून त्याच्या आत्म्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. 'रीती हाच काव्याचा आत्मा असतो.' वामनाने रीतीला गुणाचे अधिष्ठान दिले असले तरी त्याची गुणविषयक कल्पना ही काव्याच्या बहिरंगाशी अधिक संबंधित आहे.

साहित्यांतर्गत शब्दार्थाच्या साहचार्यावर भर देणारी व्याख्या रुद्रटाने केली. 'खरोखर शब्द आणि अर्थ म्हणजे काव्य' असे म्हणतो, तर 'ध्वनी' हाच काव्याचा आत्मा आहे' असे आनंदवर्धनाने प्रतिपादन केले आहे. शब्दशक्तीत ध्वनीचे स्थान अत्यंत महत्वपूर्ण आहे. ध्वन्यार्थ म्हणजे सूचितार्थ. त्यातूनच खरे काव्यसौंदर्य निर्माण होते. म्हणून 'ध्वनी हाच काव्याचा आत्मा आहे.'

विश्वनाथाने मात्र 'रस हाच काव्याचा आत्मा आहे' अशा स्पष्ट शब्दांत रसाला आत्मा म्हटले आहे. 'वाक्यं रसात्मकं काव्यम्' ही त्याची व्याख्या बहुचर्चित आहे. रसयुक्त वाक्य म्हणजे वाक्य होय. म्हणून रस हाच काव्याचा आत्मा आहे.

## ६. भारतीय साहित्यशास्त्रकारांनी केलेल्या काव्याच्या व्याख्या -

**(१) भामह (काव्यालंकार ग्रंथ)**

"शब्दार्थौ सहिती काव्यम् || ” ( शब्द आणि अर्थ यांचे सहितत्त्व म्हणजे काव्य.)

**(२) दण्डी (काव्यदर्शन ग्रंथ)**

"शरीरं तावद् इष्टार्थव्यवच्छिन्ना पदावली ||”

(इष्ट अर्थाने युक्त असलेली पदावली म्हणजे काव्यशरीर.)

**(३) वामन (काव्यालंकारसूत्रवृत्ति)**

"रीतिः आत्मा काव्यस्य ॥"

(रीती म्हणजे विशिष्ट गुणांनी युक्त अशी पदावली हाच काव्याचा आत्मा होय.)

**(४) रुद्रट (काव्यालंकार)**

"ननु शब्दार्थौ काव्यम्"

(खरोखर शब्द आणि अर्थ म्हणजे काव्य.)

**(५) आनंदवर्धन (धन्योलोक)**

"काव्यस्य आत्मा ध्वनिः ॥" (ध्वनी हा काव्याचा आत्मा होय ।)

**(६) जगन्नाथ (रसगंगाधर)**

"रमणीयार्थ प्रतिपादकः शब्दः काव्यम्"( रमणीय अर्थाचे प्रतिपादन करणारे शब्द म्हणजे काव्य.)

**(७) मम्मट : (काव्यप्रकाश)**

"तत् अदोषी शब्दार्थौ सगुणी अनलंकृती पुनः क्वापि ।" (दोषरहित, गुणयुक्त, क्वचित स्फुट अलंकाररहित शब्दार्थ म्हणजे काव्य.)

**(८) विश्वनाथ (साहित्यदर्पण)**

"वाक्यं रसात्मकं काव्यं ॥“ (रसयुक्त वाक्य म्हणजे काव्य.)

## ७. साहित्याची लक्षणे -

साहित्याची लक्षणे सांगताना अलंकार, वक्रोक्ती, रीती, औचित्य, ध्वनी रस ही लक्षणे संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी सांगितली आहेत.त्यातून साहित्याचे स्वरुप अधिक स्पष्ट होते.

## ७. साहित्याची लक्षणे -

साहित्याची लक्षणे सांगताना अलंकार, वक्रोक्ती, रीती, औचित्य, ध्वनी रस ही लक्षणे संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी सांगितली आहेत.त्यातून साहित्याचे स्वरुप अधिक स्पष्ट होते.

### (१) अलंकार :

अलंकार हे शब्द व अर्थ दोन्हीशी संबंधीत असू शकतात. काव्याची रमणीयता ही अलंकारामुळे प्राप्त होते. मामह, वामन, दण्डी हे सौंदर्य हाच काव्याचा आत्मा मानतात.

वामन अलंकाराविषयी म्हणतो की,

"काव्य ग्राहा अलंकारात सौंदर्य अलंकार: ॥

अलंकारामुळेच काव्याला काव्यप्रतिष्ठा प्राप्त होते. दण्डी म्हणतो.

"काव्यशोभा धर्मान अलंकारत प्रचक्षते ॥

काव्याला शोभा आणणारे सर्व धर्म म्हणजे काव्य होय.

भरताने नाट्यशास्त्रात सौंदर्य विलासाला अलंकार म्हटले आहे. उदा. 'सीतेचे मुख चंद्रासारखे आहे.' म्हणजेच काव्यात अलंकाराला महत्व असते. अभिनवगुप्त म्हणतो की, 'काव्यपी सर्वो नाट्यायमान एवार्या' (काव्याचा हा अभिनय म्हणजे अलंकार होय.) थोडक्यात सौंदर्य म्हणजे अलंकार होय.

## (२) वक्रोक्ती :

दररोजच्या व्यवहारातील बोलण्याच्या पद्धतीपेक्षा कवीची सांगण्याची पद्धत भिन्न असते. या बोलण्यातील भिन्नत्वालाच साधारणतः वक्रोक्ती असे म्हणतात. 'चक्र किंवा सरळ नसेल असे बोलणे म्हणजे वक्रोक्ती. याचा अर्थ केवळ वक्रता असे नव्हे तर ती एक बोलण्याची वैशिष्ट्यपूर्ण पद्धती असते. उदा. कविची उक्ती ही वक्र अशी असते. उदा. प्रियेचे मुख सुंदर आहे' असे न म्हणता कवी म्हणेल, 'कोणता मानु चंद्रमा भुवरीचा की नभीचा. उदा. कवी बी यांची कविता 'माझी कन्या' या कवितेत, 'गायी पाण्यावर काय म्हणूनी आल्या का ग गंगा यमुनाही या मिळाल्या. रसत्व हे बोलण्याच्या विदग्ध वक्रोक्तीपूर्ण व्यापाराने प्राप्त होते. उदा. प्रेमा तुझा रंग कसा ! या नाटकातील बल्लाळ यांचे संवाद वक्रोक्तीपूर्ण आहेत.

थोडक्यात अलंकार, वक्रोक्ती यामुळे काव्याच्या बाह्यांगाला शोमा येते. या गोष्टी नसताना काव्य करता येते. 'शब्दार्थाचा केवळ विलास' असे संबंध म्हणता देणार नाही. त्यामुळे सजावटीची आभूषणे, दागिने इतकेच महत्व अलंकार वक्रोक्ती यांना राहते.

## (३) रीती (वामन)

नव्या परिभाषेमध्ये वाला आपण शैली किया स्टाईल (पद्धत) असे म्हणतो. 'रीतीरात्मा काव्यस्य विशिष्टा पदरचना रीती' ही काव्यलक्षणा संधीचे संकल्पना आहे. 'रीती हाच काव्याचा आत्मा असतो' असे वामनांनी स्पष्ट केले आहे. रीतीमुळे काव्यात सौंदर्य येते. काव्यात योजिलेल्या शब्दांची वैशिष्टपूर्ण रचना असते. त्यातून काही वैशिष्टपूर्णतात. त्या काव्याच्या शब्दात, अर्थात, त्याच्या रचनेत माधुर्य, ओज, प्रसाद, प्रौढी अर्थव्यक्ती इ. अनेक गुणांचा समावेश असतो.

उदा. चांदणे शिपी जाशिल मंचले ओज, प्रसाद, माधुर्य, सौकुमार्य, उदारता, अर्थव्यक्ती आणि कांती असे दहा गुण वामनाने सांगितले आहे. गुण व अलंकार यांच्या समन्वयाला वामनाने रीती असे म्हटले आहे

वामनाने आपल्या 'काव्यालंकार सूत्रवृत्ती' या ग्रंथात काव्यगुणआणि अलंकार याचे विस्तृत विवेचन करून सौंदर्य अलंकार अशी व्याख्याकरून सौंदर्याला काव्याचे मुख्य तत्त्व मानले. उपमा, उत्पेक्षा, अनुप्रासआदि अलंकार काव्याचे सौंदर्य वाढवितात आणि काव्यगुण हे अंगभूत असतात. उदा. सुंदर स्त्रिचे लावण्य हा तिचा नित्यगुण, पण तिने शरीरावर धारण केलेले अलंकार हे केवळ मुळचे सौंदर्य खुलवणारे बाह्योपचार होय. वामनाने आपल्या रीती विचारामध्ये अलंकारापेक्षा गुणांना अधिक महत्व दिले आहे.

## (४) औचित्य (क्षेमेन्द्र)

क्षेमेन्द्र या साहित्य शास्त्राज्ञाने 'औचित्यविचारच या प्रचा औचित्य हे रसाचे जीवीत आहे असे सांगितले आहे. 'औचित्यस्य रसजीवीत भूतस्य' असे म्हणतो. शब्दार्थाला काव्यत्व प्राप्त होण्यासाठी औचित्य लाभणे आवश्यक आहे. उचीत गोष्ट म्हणजे योग्य, व साजेशी गोष्ट. ती तशी असणे म्हणजे औचित्य होय. सुंदर वस्तू योग्य ठिकाणी योजली जाणे हे अनुचित आहे. अनौचित्य हे रस भंगकारक असते.

काय सांगितले आहे यापेक्षा कसे सांगितले आहे याला महत्व असते. औचित्याला रसाचे जीवित मानतो. औचित्य म्हणजे रसाचा उत्कर्ष असतो. 'अनौचित्यह्यते नादसंभगस्य कारणम्' अनौचित्य झाले की, रसभंग होतो, असे क्षेमेंद्र म्हणतो. रसाचा उत्कर्ष साधणारी शब्दालंकाराची योजना म्हणजे औचित्य होय.औचित्य हा भाववाचक शब्द आहे. उचित शब्दावरून औचित्य,औचित्याची महती ही 'ध्वन्यालोक' या ग्रंथात सांगितली आहे.

१. औचित्य हे रसाचे जीवीत आहे.

२. औचित्यामुळे काव्यास सौंदर्य येते.

३. काव्यात औचित्य हेच मुख्य तत्त्व असते.

४. औचित्य नष्ट झाले की रसभंग होतो.

५. औचित्य ही रसोत्पत्तीची गुरुकिल्ली आहे. पद, वाक्य, गुण, अलंकार, रस देश, काल याबरोबर क्रियाकारक लिंग वचन, उपसर्ग यांचेही काव्यदृष्ट्या औचित्य आणि अनौचित्य दिसून येते.

उदा. गोविंदाग्रज, राजहंस माझा निजला' किंवा भा. रा. तांबे यांची 'सहज तुझी हालचाल' या कवितेतील सुंदर शैली, 'रुद्रास आवाहन' मधील ओजपूर्ण शैली, 'तर मग गट्टी कोणाशी' तील बालसुलभ शब्दशैली त्या त्या कवितेतील भावाभिव्यक्ती व रसनिर्मितीस पोषक ठरणारी आहे.

ललितसाहित्य हे व्यंग्यार्थप्रधान असते. म्हणजे त्यात सुचितार्थाला महत्व असते. साहित्यातून प्रतीत होणारा रस व्यंग्य-सूचित ध्वनित असतो. म्हणून रसालाही सामावून घेणाऱ्या ध्वनी तत्त्वाला आनंदवर्धनाने काव्याच्या केंद्रस्थानी ठेवले. 'काव्यस्य आत्मा ध्वनिः' अर्थात 'ध्वनी हा काव्याचा आत्मा आहे. रसतत्त्वाप्रमाणेच ध्वनीलाही काव्याचा आत्मा म्हटले गेले. शब्दार्थातून ध्वनीत रसप्रतीती म्हणजे रसध्वनी होय. क्रोध, भय, शोक, प्रेम आदि शब्द उच्चारल्यानंतर त्याचा वाच्यार्थ प्रतीत होतो; परंतु भावानुभूती येत नाही. साहित्यात भावनुपूर्ती येण्यासाठी रसप्रतीच्या मुळाशी ध्वनीतत्त्व असल्यामुळे 'ध्वनी हा काव्याचा आत्मा' असा सिद्धांत प्रस्थापित झाला.

उदा. जसे 'पहाटे कोंबड्यान बांग दिला' ही एक जीवनव्यवहारातील घटना. भल्या पहाटे कोंबड्याचे आरवणे किंवा ओरडणे हा त्याचा वाच्यार्थ पण ऐकणाऱ्यांच्या मनोवस्थेनुरूप या वाक्यातून मित्र अर्थ ध्वनित होतात. तेच ध्वन्यर्थ होय.

## (६) रस:

रस ही संकल्पना स्पष्ट करताना रा. श्री. जोग म्हणतात की, 'रस म्हणजे भावना. काव्य वाचल्याने वाचकाच्या मनात ही भावनाजागृती होते.' त्याला काही भावनिक अनुभव येतो. श्रृंगार, वीर, करुणा इत्यादी रसात अनुरूप अशा भावनांचा तो अनुभव असतो. त्या भावनांची जागृती त्याच्या मनात होते. ती त्याला सुखदायक वाटते. म्हणून रमणीय व आकर्षक होते. अशी भावनांची जागृती मनात उत्पन्न होण्यास त्या भावनांचे सुंदर चित्र व ते चित्र मूर्तीमंत डोळ्यापुढे उभे करणारे शब्दार्थ कारण होतात.

भारतीय साहित्यशास्त्रकारांच्या दृष्टीने सर्वाधिक महत्व प्राप्त ३ लेले असणारे आणि काव्यलक्षणामध्ये केंद्रस्थानी असणारे तत्त्व म्हणजे 'रस' होय. 'नाट्यातील रसनिष्पत्ती अभिनयाच्या माध्यमातून होते' हा सिद्धांत सर्वप्रथम भरताने आपल्या 'नाट्यशास्त्र' या ग्रंथात मांडले. विश्वनाथने 'रस हाच काव्याचा आत्मा आहे' असे रसाविषयी मत मांडले. रस ही एक अनुभूतीची प्रक्रिया आहे. काव्यातील शब्दार्थाच्या मध्यमातून वाचकास अनुभूती येते. म्हणून 'रस हाच काव्याचा आत्मा आहे' अशा ठाम शब्दात विश्वनाथांनी मत मांडले आहे.

थोडक्यात साहित्य हा दैनंदिन व्यवहारात नेहमीच वापरला जाणारा शब्द आहे. साहित्य म्हणजे साधना असा शब्दप्रयोग केला जातो. 'जे जे वाणीमय ते ते वाड़मय, तसेच जे जे लिखित ते ते साहित्य', अशी अर्वाची व्यापकता सांगता येते. वाङ्मयाच्या दृष्टीने साहित्याचा अर्थ कथा, कादंबरी, कविता, नाटक अशा प्रकारचा घेतला जातो.

# धन्यवाद !

